IJARSCT
ISSN (Online) 2581-9429
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
Impact Factor: 5.731
Volume 2, Issue 7, January 2022

# काळाराम मंदिर सत्याग्रह

**सौ. योजना यो. हळदे**
एम. एम. जगताप कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय महाड. रायगड

**सारांश:**

**बाबासाहेब आंबेडकर डॉक्टर आंबेडकरांनी अस्पृश्यता निवारणासाठी जे लढे दिले. त्यात काळाराम मंदिराच्या सत्याग्रहाचं अभूतपूर्व स्थान आहे. फक्त सनातने हिंदूनाच जाग करण्यासाठी नव्हे तर त्या वेळचे सत्ताधारी इंग्रजांनाही जाग यावी आणि त्या वेळेच्या दलितांना शोषितांना सर्व मूलभूत हक्क मिळावेत यासाठी त्यांनी हा लढा उभारला होता.**

**प्रस्तावना:**

काळाराम मंदिराचा सत्याग्रह म्हणजे शोषितांना त्यांचा हक्क मिळावा यासाठी आंबेडकरांनी स्पृश्य व संवर्णांना केलेले एक आवाहन होते.आज आपण मंदिरात प्रवेश करणार आहोत. मंदिरात प्रवेश केल्यामुळे आपले प्रश्न सुटणार नाहीत. आपले प्रश्न राजकीय आहेत, सामाजिक, आर्थिक,आणि शैक्षणिक आहेत.

**सत्याग्रह:**

काळाराम मंदिर सत्याग्रह हा डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली दोन मार्च इसवी सन 1930 रोजी महाराष्ट्राच्या नाशिक शहरातील अस्पृश्यांचा काळाराम मंदिरामध्ये प्रवेशासाठी सत्याग्रह होता आंबेडकरांनी अस्पृश्यता निवारणासाठी जे लढे दिले त्यात काळाराम मंदिराच्या सत्याग्रहाचे महत्त्वाचे स्थान आहे फक्त हिंदूनाच नव्हे तर सत्ताधारी इंग्रजांनाही जागी यावी आणि त्यावेळच्या संपूर्ण दलितांना शोषितांना सर्व मूलभूत हक्क मिळावेत यासाठी त्यांनी हा लढा उभारला होता हा लढा पुढील पाच वर्ष चालला त्यावेळी सत्ताधारी इंग्रजांच्या दडपशाहि विरोधात कॉंग्रेस लढत होत तर हिंदू धर्ममार्तंड शाही विरोधात ओबेडकरांचासंघर्ष सुरु होता काळाराम मंदिराचा सत्याग्रह म्हणजे शोषितांना त्यांचा हक्क मिळावा त्यासाठी आंबेडकरांनी स्पृश्य व संवर्णांना केलेले एक आव्हान होते.

IJARSCT

ISSN (Online) 2581-9429

International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)

International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal

Impact Factor: 5.731

Volume 2, Issue 7, January 2022

आज आपण मंदिरात प्रवेश करणार आहोत मंदिरात प्रवेश केल्यामुळे आपले प्रश्न सुटणार नाहीत आपले प्रश्न राजकीय आहेत सामाजिक धार्मिक आर्थिक आणि शैक्षणिक आहेत काळाराम मंदिरात प्रवेश करणे म्हणजे हिंदू म्हणाला केलेले आवाहन आहे उच्चवर्णीय हिंदूंनी आपल्याला आपल्या हक्कांपासून अनेक पिढ्यांपासून दूर ठेवले आता तेच हिंदू आपल्याला आपला मानवी हक्क देतील का हा प्रश्न या काळाराम मंदिर सत्याग्रहाच्या माध्यमातून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी विचारलेला आहे हिंदू मन हे आपल्याला एक मानव म्हणून स्वीकारावयास तयार आहे की नाही याची पडताळणी या सत्याग्रहाद्वारे होणार आहे.

इसवी सन १९२९ च्या ऑक्टोबर मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्याशी विचार विनिमय करून नाशिक जिल्ह्यातील अस्पृश्यांच्या पुढा त्यांनी नाशिक येथील काळाराम मंदिरात अस्पृश्यांनी प्रवेश करावा व गरज वाटल्यास सत्याग्रह करावा असे निश्चित करण्यात आले. अस्पृश्य पुढार्यांनी नाशिक येथे सत्याग्रह समिती स्थापन केली दोन मार्च १९३०हा मंदिर प्रवेश सत्याग्रहाचा ऐतिहासिक दिवस ठरला.

अडचणी :

मंदिरात प्रवेश करण्याच्या दिवशी पहिल्या तुकडीत १२५ पुरुष आणि २५ स्त्रिया जातील चार नेते मंदिराच्या चारी दिशावर आपल्या सहकार्यासह तयार होते मंदिराचे सर्व दरवाजे बंद करण्यात आले होते .दरवाजे उघडल्यास सत्याग्रही मंदिरात प्रवेश करणार मंदिराभोवती हजारांच्या वर बंदूकधारी सैनिक तैनात करण्यात आले होते.रामनवमीच्या आधी सनातनी हिंदू आणि सत्याग्रहांच्या नेत्यांमध्ये तडजोड झाली की स्पृश्य -अस्पृश्यांनी मिळून रामाचा रथ ओढावा. कार्यकर्त्यासह डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मंदिराजवळ आले. परंतु रथाला हात लावण्यापूर्वीच सनातन हिंदूंनी सत्याग्रहींना हुलकावणी देऊन तो रथ दुसरीकडे पळवला .जेव्हा सत्याग्रहीच्या लक्षात ये- ताच त्यांनी सर्व ताकद लावून रथ थांबविला.

तेव्हा मारामारी व आंबेडकरांच्या अनुयायावर दगडांचा वर्ष झाला. इतक्यात पोलिसांचा कडा फोडून भास्कर केंद्रे नावाचा सत्याग्रही मंदिरात घुसला आणि रक्ताने माखून बेशुद्ध पडला.आंबेडकरांवर दगड लागू नये म्हणून त्यांच्यावर छत्री धरली होती.तरीसुद्धा त्यांना इजा झाल्या होत्या. त्या घटनेत एक तरुण रक्त बंबाळ झाला नंतर त्याचा मृत्यू झाला. सत्याग्रहा नंतर नाशिक मधल्या अस्पृश्यांच्या मुलांच्या शाळा, रस्ते, बंद करण्यात आल्या तसेच त्यांना दुकानातून वस्तू देखील मिळेनाशा झाल्या. ही दुःख भोगून हे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी सत्याग्रह सुरूच ठेवला.



ISSN 2581-9429 IJARSCT

IJARSCT

ISSN (Online) 2581-9429

IJARSCT

Impact Factor: 5.731

International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)

International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal

Volume 2, Issue 7, January 2022

यादरम्यान आंबेडकर गोलमेज परिषदांसाठी लंडनला गेले. त्यांच्या अनुपस्थितीत भाऊराव गायकवाड यांनी सत्याग्रह सुरूच ठेवला. पाच वर्षे हा लढा चालूनही अस्पृश्यांना मंदिर प्रवेश मिळाला नाही. १९३४रोजी गायकवाड यांना पत्राद्वारे सांगण्यात आले सत्याग्रह सुरू ठेवून शक्ती वाया घालवण्यापेक्षा राजकीय हक्क व शिक्षण घेण्याची सोय मिळवण्यासाठी वापरावी. म्हणून आता सत्याग्रह बंद करण्यात यावा. त्यानंतर मंदिराचा सत्याग्रह बंद करण्यात आला.

**निष्कर्ष:**

एकूणच बाबासाहेबांच्या विचारांची बैठकच मुळात स्वातंत्र्याकडे वाटचाल करणारी व गुलामगिरीच्या बेड्या तोडून मुक्तता मिळविणारी होती.व बाबासाहेब जसे बोलले तसे वागतही असत. पुढेबाबासाहेबांनी भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर घटना समितीकडे घटना लेखनाचे काम करताना भारतातील सर्व वर्गांचा तळागाळातील सर्वांचा विचार केला कुणावरही अन्याय होणार नाही हेच भूमिका घटना लिहिताना बाबासाहेबांची होती. संवर्ण आणि खूप त्रास दिला म्हणून त्यांचे अधिकार डावलले नाही. व त्यांना कधीही वगळावे असे वाटले नाही प्रत्येक मनुष्याला त्याचे अधिकार मिळालेच पाहिजे.

**संदर्भ:**

१) डॉक्टर आंबेडकर आणि काळाराम मंदिर सत्याग्रह-य .दि. फडके.

२) डॉक्टर आंबेडकरांनी भारतीय राज्यघटना -रावसाहेब कसबे

३) महाराष्ट्र टाईम्स

४) Loksatta.https ://www.loksatts.com

५) https://Mr.m Wikipedia.org

Copyright to IJARSCT
www.ijarsct.co.in

ISSN 2581-9429 IJARSCT